# दि रीडिंग क्लब' उपक्रम अहवाल- कार्यक्रम क्र. १

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**दि. ७ मार्च २०२५ रोजी** मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या *'दि रीडिंग क्लब – वाचन कट्टा'* या उपक्रमांतर्गत श्री. धम्मरत्न जावळे, शिक्षणक्रम संयोजक, जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या यांनी *"Trauma of Caste: A Dalit Feminist Meditation on Survivorship, Healing and Abolition"* या पुस्तकावर परिचयात्मक सादरीकरण केले. हा कार्यक्रम दुपारी ४.१५ वाजता विद्याशाखेच्या सभागृहात पार पडला. कार्यक्रमास शिक्षक, शैक्षणिक समुपदेशक, विद्यार्थी तसेच वाचन कट्ट्याचे सदस्य उपस्थित होते.



थेनमोळी सुंदराजन, अमेरिकन लेखिका आणि दलित-हक्क कार्यकर्ता यांनी लिहिलेल्या या पुस्तकात जातीवादामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक आघाताचा (ट्रॉमा) सखोल वेध घेतलेला आहे. श्री. जावळे यांनी पुस्तकातील मुख्य मुद्दे समजावून सांगताना जातिभेदाचे दूरस्थ अनुभव एका पिढीतून दुसऱ्या पिढीत कसे वहन होतात आणि त्या मानसिक जखमा वैयक्तिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्तरावर कशा परिणाम करतात, यावर प्रकाश टाकला. सादरीकरणात जातीव्यवस्थेमुळे होणारी मानसिक जडणघडण, वंचित समाजाच्या संघर्षांची जाणीव, आणि त्यावर मानसिक-आध्यात्मिक उपाययोजना या पुस्तकातून मांडण्यात आलेल्या विचारांची सविस्तर चर्चा झाली. त्यांनी हे पुस्तक केवळ दलित अनुभवांचे प्रतिबिंब नसून सर्वसमावेशक मानवतावादी दृष्टिकोन देणारे असल्याचे स्पष्ट केले.

सादरीकरणानंतर प्रश्नोत्तर व चर्चा सत्र झाले. सहभागी शिक्षक व समुपदेशकांनी पुस्तकातील विचारांशी संबंधित आपली मते व्यक्त केली. सर्वांनीच या चर्चेचे कौतुक केले व दलित साहित्य, मानसिक आरोग्य आणि सामाजिक न्याय याबद्दल नवीन दृष्टिकोन मिळाल्याचे नमूद केले. एकूणच, *"Trauma of Caste"* या पुस्तकाच्या परिचयात्मक चर्चेने वाचनसंस्कृतीला चालना देत जातिनिर्मूलन, मानसिक आरोग्य आणि सामाजिक समतेविषयी चिंतनशील विचार निर्माण केले. वाचन कट्ट्याचा हा उपक्रम वैचारिक व सामाजिक दृष्टिकोन समृद्ध करणारा ठरला.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक *